परिपत्रक

**विषय - विद्यापीठाच्या परीक्षा/अन्य कामासाठी घेण्यात येणा-या अग्रीमबाबत सुधारित नियमावली**

1. विद्यापीठाच्या परीक्षा व आकस्मिक खर्चासाठी विद्यापीठ/महविद्यालयीन शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी व महाविद्यालय/संस्थांना अधिकार प्रदान नियमावलीनुसार अग्रीम मंजूर करण्यात येईल.
2. ज्या कारणासाठी अग्रीम घेतला आहे त्याच कारणासाठी अग्रीमाची रक्कम खर्च करण्यात यावी.
3. अग्रीमाचे समायोजन शेवटचा खर्च झाल्यापासून एक महिन्यामध्ये करण्यात यावे. व कायमस्वरूपी अग्रीमबाबत समायोजन ज्या आर्थिक वर्षात अग्रीम घेतला आहे त्या आर्थिक वर्षाअखेर (31 मार्च अखेर) करण्यात यावे.
4. ज्या कारणासाठी अग्रीम घेतला असेल ते कारण पूर्ण झालेनंतर अखर्चित रक्कम लेखा संहितेतील तरतूदीनुसार तात्काळ शेवटच्या खर्चाच्या देयक/प्रमाणकांच्या दिनांकापासून 7 दिवसाचे आत कार्यालयास जमा करावी. यासाठी हिशेब पूर्ततेची वाट पाहू नये.
5. पहिल्या अग्रीम रकमेचे समायोजन केल्याशिवाय दुसरा अग्रीम मान्य केला जाणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत अधिकार प्रदान नियमावलीनुसार दुसरा अग्रीम मान्य करण्यात येईल. याबाबत प्रलंबित अग्रीमबाबत अभिप्राय नमूद करावा.
6. अग्रीम अंतिम खर्चाच्या लेखाशीर्षकाच्या तरतूदीच्या अधीन राहून मान्य करण्यात येईल.
7. **व्यवस्थापन परिषदेच्या दि. 24/08/2022 च्या ठरावानुसार दंडणीय व्याजदर भविष्यनिर्वाह निधीवरील त्यावेळचा व्याजदर + 1 % असा राहील. व याची अंमलबजावणी दि.24/08/2022 पासूनच्या अग्रीमसाठी राहील व यापूर्वीच्या अग्रीमबाबत पूर्वीच्या परिपत्रकातील नमूद दरानुसार दंडणीय व्याज आकारण्यात येईल.**
8. अग्रीमबाबत सनदी लेखा परीक्षण व मा. महालेखाकार कार्यालयाकडील लेखापरीक्षणामध्ये आक्षेप नोंदविण्यात आले असलेने सदर बाब संलग्नीत महाविद्यालये/संस्था यांनी तसेच सर्व अधिविभागप्रमुख व प्रशासकीय अधिकारी तथा विभागप्रमुख यांनी आपल्या अधिपत्याखालील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी व विहित मुदतीत खर्चाचे हिशेब सादर करून अग्रीम रक्कमेचे समायोजन करण्याची कार्यवाही करावी.
9. महाविद्यालयीन शिक्षकांकडील प्रलंबित अग्रीमबाबत, संबंधीत शिक्षक सेवानिवृत्त होताना संबंधीत महाविद्यालय/संस्था यांनी संबंधीत शिक्षकांचे No Dues देताना विद्यापीठाकडील प्रलंबित अग्रीम रक्कमेबाबत कार्यालयाच्या वित्त विभागाकडून No Dues घ्यावे.
10. अग्रीम समायोजनाची जबाबदारी अग्रीम मागणी करणा-या विभागाची/अधिविभागाची राहील.

तरी उपरोक्त परिपत्रकानुसार महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठातील विविध विभागप्रमुख तसेच अधिविभागप्रमुख यांनी अंमलबजावणी करून अग्रीमबाबत नियमावली आपल्या अधिपत्याखालील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावी.

वित्त व लेखा अधिकारी

जा.क्र.शिवाजीवि/कॅशबुक/ 000039

दि. 7 NOV 2023